पुढारी | बुधवार ४ मार्च २०१५



दोडामार्ग : मराठी भाषादिनानिमित्त बोलताना लेखक हरिश्चंद्र भिसे. सोबत प्रा. डॉ. पाटील व अन्य.
(छाया : रत्नदीप गवस)

# अभिजात भाषेच्या दर्जासाठी मराठी भाषिकांचा पुढाकार आवश्यक : भिसे

दोडामार्ग : वार्ताहर

वाङ:मय समृद्ध असलेल्या काही निवडक भाषांमध्ये मराठी भाषेचा समावेश होतो. मात्र, मराठी नेत्यांची, राज्यकर्त्यांची अनास्था यामुळे ही साहित्य समृद्ध भाषा गेली कित्येक वर्षे अभिजात भाषेचा दर्जा मिळविण्यासाठी मंत्रालयाच्या दारावर तिष्ठत आहे. 'मराठी'ला अभिजात भाषेचा दर्जा मिळविण्यासाठी आता मराठी भाषिकांनीच पुढाकार घेतला पाहिजे, असे प्रतिपादन कळणे ग्रंथालयाचे संस्थापक तथा लेखक हरिश्चंद्र भिसे यांनी केले.

दोडामार्ग येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. हनुमंत महामळ, प्रा. डॉ. व्ही. ए. पाटील, प्रा. दिलीप बर्वे उपस्थित होते. जागतिक मराठी दिनानिमित्त महाविद्यालयात 'मराठी भाषा ही ज्ञान भाषा कशी होईल' या विषयी निबंध स्पर्धा तसेच मराठी भाषा गौरव गीत गायन स्पर्धेचे आयोजन केले होते.

विजेत्या तीन स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. महाविद्यालय ग्रंथालय विभाग व कळणे मुक्तद्वार ग्रंथालय यांच्या विद्यमाने ग्रंथ प्रदर्शन भरविण्यात आले होते.

रांगोळी, पोस्टर प्रदर्शनही मांडण्यात आले होते. सूत्रसंचालन प्रा. बर्वे व प्रास्ताविक प्रा. पाटील यांनी केले. आभार विमल माणिक यांनी मानले.